दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३४६ वा | गुरुवार दि. १२ ऑक्टोबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## सरकारला जनतेचे काही देणे घेणे नाही : नाना पटोले



**मुंबई ।** भाजप सरकार अत्याचारी आहे. सोयाबीनचे भाव कमी झाले आहेत. राज्यातील सरकार कॉमेडी शो सारखे आहे. इथल्या जनेतचे सरकारला काही देणेघेणे नाही. राज्यातील सरकार झोपी गेले आहे. शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त करत आहे .दुष्काळ जाहीर केला पाहिजे. पण तो होत नाही, शेतकरी अडचणीत आहे. सामान्य नागरिक महागाईने त्रस्त आहे. यावर सरकार काही करत नाही, असे म्हणत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शिंदे सरकारवर निशाणा साधला आहे.

## न्यूज कॉलम

### वाहन अपघातात पिता-पुत्र जखमी

**धुळे ।** दुचाकी आयशरवर धडकून झालेल्या अपघातात आर्वी (ता. धुळे) येथील पिता-पुत्र जखमी झाल्याची घटना साक्री तालुक्यात घडली. दिलीप बापू मोहिते यांनी साक्री पोलिसांना दिलेल्या फिर्यादीनुसार रविवारी सकाळी अकराला सुरत महामार्गाने भरधाव आशयर (जीजे ३३, टी ८४९३) जात होता. चालकाने अचानक ब्रेक दाबल्याने मागून येणारी दुचाकी (एमएच १८, एएल ५९२०) आयशरवर आदळली. अपघातात रवींद्र बापू मोहिते (वय २८) आणि त्यांचा मुलगा (८) हे दोघे जखमी झाले. अपघातानंतर आयशर चालक पळून गेला.

### शहरातील मटन मार्केट दहा दिवस बंद राहणार

**धुळे ।** धुळे महानगरपालिका हद्दीतील सर्व मटन मार्केट १५ ते २४ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत घटस्थापना, नवरात्रोत्सव, अष्टमी, नवमी, विजयादशमी (दसरा) व बालाजी रथ उत्सव होणार आहे. त्यामुळे या उत्सवापर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे. संबंधित व्यावसायिकांनी नोंद घेवून मटन विक्री दुकाने बंद ठेवावीत, असे मुल्य निर्धारण व कर संकलन अधिकारी धुळे महानगरपालिका, यांनी कळवले आहे.

# महिलांनो रस्त्यावर उतरा, केसेस टाकल्या तरी हरकत नाही, सरकार बदलल्यावर केसेस हटवू : शरद पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचा शरद पवार महिला मेळावा मुंबईत पार पडला. यावेळी महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे, खासदार सुप्रिया सुळे, अध्यक्ष शरद पवार यांच्यासह प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी महिलांना मार्गदर्शन केलं. शरद पवार यांनी महिलांना अन्यायाविरोधात रस्त्यावर उतरण्याचं आवाहन केलं. समाजात चुकीचं काही दिसलं तर रस्त्यावर उतरा, सरकार केसेस टाकेल, पण तरीही घाबरु नका. सरकार बदलत असतं, आपण त्या केसेस मागे घेतो, असं शरद पवार म्हणाले.

अनेक तास बसून देखील कुणी सभागृहाच्या बाहेर गेलं नाही. सर्वांनी संघटनात्मक कामाबाबतची भूमिका मांडली आणि ऐकून देखील घेतली आहे. आपल्याला काही कार्यक्रम हाती घाययचे आहेत यामध्ये महिला आरक्षण, महागाई असे मुद्दे आहेत. आपण महिला आरक्षणाचा निर्णय घेतला होता.आरक्षण निर्णयामुळे स्पष्ट झालं की महिला पुरुषांपेक्षा कमी नाहीत. आपण संरक्षण खात्यात आरक्षण देण्याचा निर्णय घेतला, त्यावेळी अनेकांचा विरोध होता. मात्र मी स्वतः मंत्री म्हणून तो निर्णय घेतला आणि आता तुम्हाला महिला सैन्यात दिसत आहेत. ही जमेची एका बाजूला परिस्थितीत आहे, दुसरीकडे मणिपूरसारखी घटना समोर येते. त्यामुळं आपल्याला जागरुक राहावं लागणार आहे. जर आता असा प्रकार कुठं घडला तर आपल्या भगिनी रस्त्यावर उतरायला हव्या. काय होईल तर ते केस टाकतील, विविध कलमे लावत असतात. तुम्ही चिंता करु नका, सरकार बदलत असते आणि आपण त्या केसेस काढून टाकत असतो. आता शाळा समायोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सावित्रीबाई फुले यांनी विरोध असताना शाळा काढली आणि आता शाळा बंद करणं योग्य नाही. एका बाजूला नोकऱ्या नाहीत आणि दुसरीकडे रिक्त जागा मोठ्या आहेत. आणि सरकार कंत्राटी पदावर नेमणुका करत आहेत हे योग्य नाही. आपल्याला काही कार्यक्रम हाती घाययचे आहेत. यामधे महिला आरक्षण, महागाई यांचा समावेश आहे. मी संरक्षण मंत्री असताना सैन्यात महिलांना आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. आरक्षणाच्या निर्णयामुळे स्पष्ट झालं की महिला पुरुषांपेक्षा कमी नाहीत. दुसरीकडे मणिपूरसारखी घटना समोर येते त्यामुळं अपल्याला जागृत राहावं लागणार आहे. जर आता असा प्रकार कुठं घडला तर आपल्या भगिनींनी रस्त्यावर उतरायला हवं. याचे परिणाम काय होतील तर ते केस टाकतील, विविध कलमे लावतील अशी भीती तुम्हाला असेल तर तुम्ही त्याची चिंता करु नका. कारण सरकारं बदलत असतात आणि आपण त्या केसेस काढून टाकत असतो. सरकारी नोकरीमुळं कुटुंबाला स्थिरता येते. परंतू कंत्राटी पदावर नेमणुका होत असतील तर तिथं आरक्षण नाही. त्यामुळं तिथं महिलाना संधी मिळणार नाही. त्यामुळं या कंत्राटी भरतीविरोधात आपल्याला रस्त्यावर उतराव लागेल, असंही शरद पवार यावेळी म्हणाले.

### शाळेच्या मैदानात गौतमी पाटीलचा कार्यक्रम

पण यामुळं शाळेची शासकीय मालमत्ता आणि उपयोग हा वैयक्तिक कारणासाठी होऊ शकेल. याचं एकच उदाहरण द्यायचं असेल तर ते म्हणजे नाशिकमधील एक शाळा मद्य तयार करणाऱ्या कंपनीनं दत्तक घेतली आहे. त्या शाळेमध्ये नुकताच गौतमी पाटीलच्या नृत्याचा कार्यक्रम घेतला गेला. आता असा आदर्श आम्ही मुलांसमोर ठेवणार आहोत? त्यामुळं शासकीय शाळा खासगी कंपनीला द्यायचा सरकारचा जो निर्णय आहे, याला सुद्धा आपण विरोध केला पाहिजे, असंही यावेळी शरद पवार यांनी म्हटलं आहे.



### सरकार बदलल्यावर केसेस हटवू

दरम्यान शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, समाजात चुकीचे काही दिसले तर रस्त्यावर उतरा, सरकार केसेस टाकेल, पण तरीही घाबरु नका, सरकार बदलत असते, आपण त्या केसेस मागे घेतो असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी महिलांना राजकारणात सक्रिय होण्यास सांगितले आहे. तर कुठे अन्याय होत असल्यास रस्त्यावर उतरत आक्रमक होण्यास सांगितले आहे.

### शाळा खासगी कंपन्यांना देणार दत्तक

राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्यावतीनं आयोजित कार्यक्रमात शरद पवार बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, अनिल देशमुख, रोहिणी खडसे आदी उपस्थित होते. पवार म्हणाले, ज्या शाळा आहेत जिल्हा परिषदेच्या त्या आता खासगी कंपनीला देण्यात येत आहेत. त्यांनी या शाळा सीएसआर खात्यातून चालवाव्यात, त्याच्यातून शाळेचा विकास करावा अशी त्यांची अपेक्षा आहे. पण आता जी कंपनी शाळा दत्तक घेईल त्या शाळेला कोणतं नाव द्यायचं याचा अधिकार त्यांना आहे. भविष्यात त्या कंपनीला शाळेच्या कारभारात हस्तक्षेप करायचा अधिकार आहे.

# भेसळखोरांवर अन्न आणि औषधे विभागाने कडक कारवाई करावी



### आम आदमी पार्टीची मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**

येणाऱ्या सण उत्सवातील नवरात्र, दसरा दिवाळीमध्ये खाद्यतेल उत्पादक व वितरण तसेच विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर आणि जनतेचे आरोग्याशी खेळणाऱ्यांवर अन्न विभाग नाशिक यांनी शहरातील उत्पादक तसेच वितरण, काही रिपॅकर कंपन्या शुद्ध खाद्यतेलामध्ये पामोलीन तेल तसेच कॉटन तेल हे मिक्स करत असतात. त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी नाशिकच्या आम आदमी पार्टीतर्फे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सणासुदीच्या दिवसात या रिपॅकर कंपन्यांवरही करडी नजर ठेवून भेसळयुक्त खाद्यतेल व खाद्यपदार्थ यांचे वेळोवेळी नमुने प्रयोग शाळेतून तपासून घ्यावेत. तसेच सणावाराच्या वेळेस अन्नपदार्थ मिष्टांन्न, मिठाई व इतर अन्न पदार्थ बनवणाऱ्या दुकानांकडून वेळोवेळी मिठाईचे पदार्थ घेऊन त्यांची प्रयोग शाळेमध्ये तपासणी करावी. भेसळ करणाऱ्या दुकानदारांवर कायमस्वरूपी कडक कारवाई करावी अशा आशयाचे निवेदन अन्न विभागातील सहाय्यक उपायुक्त लोहकरे यांना देण्यात आले. या प्रसंगी राज्य संघटन मंत्री नवीदरसिंग अहलुवालिया, गिरीश उगले-पाटील, अल्ताफ शेख, चंद्रशेखर, महानुभाव, अनिल फोकणे, दीपक सरोदे, अमर गांगुर्डे, स्वप्निल घिया, अमित यादव, प्रदीप लोखंडे, कलविंदर गरेवाल, गोरख मोहिते, शकील शेख, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# समृद्धी महामार्गावर सरकारी वकील अजय मिसर यांच्या कारचा अपघात

**नाशिक । प्रतिनिधी**

श्रीरामपूर ते मुंबई नाशिकमार्गे असा प्रवास बुधवारी (दि.११) नाशिकचे विशेष सरकारी वकील अजय मिसर यांचा ताफा समृद्धी महामार्गावरून करत होता. घोटी ओलांडल्यानंतर इगतपुरीजवळच्या भरवीर बुद्रूक शिवारात त्यांची कार समोरच्या ट्रकवर जाऊन आदळली. यामुळे त्यांच्या पायांना व चेहऱ्याला दुखापत झाली असून खांद्याला मुका मार लागला आहे. तातडीने पोलिस व रूग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्याने जखमींवर तेथेच प्रथमोपचार देण्यात आले. मिसर यांच्यासह सहायक वकिल व वाहनचालक यांची प्रकृती स्थिर आहे.




याबाबत अधिक माहिती अशी, न्यायालयीन कामकाजासाठी ॲड. अजय मिसर, सहायक वकील प्रथमेश शिंगणे हे श्रीरामपुर तालुका न्यायालयात बुधवारी सकाळी गेले होते. तेथील खटल्याच्या सुनावणीचे कामकाज आटोपून मिसर यांचा ताफा नाशिकमार्गे मुंबईच्या दिशेने समृद्धी महामार्गावरून निघाला. एस्कॉर्ट जीप ही टाटा सफारी कारच्या (एम.एच०१ सीपी १६१८) पाठीमागे होती तर सफारी कारमधून अजय मिसर, शिंगणे हे प्रवास करत होते. चालक सचिन भोईंजकर हे कार चालवत होते. भरवीर गावाच्या शिवारात कार पोहचली असता समृद्धी महामार्गावर कारपुढे चालत असलेल्या ट्रकच्या चालकाने अचानकपणे वेग कमी केला. यामुळे भोईंजकर यांना कारच्या वेगावर त्वरित नियंत्रण मिळविणे अवघड झाल्याने कार ट्रकवर पाठीमागून जाऊन आदळली. हा अपघात दुपारी पावणे चार वाजेच्या सुमारास झाला. सुदैवाने या अपघातात कारमध्ये असलेले सर्वच बचावले. यानंतर नाशिकच्या दिशेने मिसर माघारी आले.

# अवैध धंदेवाल्यांची गय केली जाणार नाही : ना. भुसे

**नाशिक । प्रतिनिधी**

आज जे घाणेरडे आरोप माझ्यावर केले आहेत ते पूर्णपणे राजकीय हेतूने प्रेरित आहेत. सुषमा अंधारे यांनी जे आरोप केलेत ते सिद्ध करावेत अन्यथा मालेगावच्या जनतेची माफी मागावी असे झाले नाही तर कायदेशी कारवाई करू. असा इशारा नाशिकचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी दिला आहे.



पालकमंत्री भुसे म्हणाले की, ड्रग्स बाबत काही दिवसापूर्वी माहिति मागवली होती. त्यानुसार शहरात पोलिस कारवाई होत आहे. काहीवेळा बाहेरील टीम बोलवून कारवाई करावी लागते. याचा अर्थ स्थानिक पोलिसांवर विश्वास नाही असा होत नाही. येत्या काही दिवसात अजून अवैध धंद्यांवर कठोर कारवाई होईल. अवैध धंदे चालकांना पाठीशी घातले जाणार नाही. तो कुठल्याही पक्षाचा असो अथवा कुणीही असो त्याच्यावर कठोरातील कठोर कारवाई करण्यात येईल. येत्या काही दिवसात विशेष पथकांच्या माध्यमातून इतर अवैध धंद्यांवर देखील टाच आणली जाईल असे एका निवेदनाद्वारे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले आहे.

# एका आमदाराच्या पगारावर किती शिक्षक काम करू शकतील

### नाशिकमधील आंदोलनातून कंत्राटी शिक्षकांचा सवाल

**नाशिक । प्रतिनिधी**

'सरकार जर का म्हणत असेल एक कर्मचाऱ्यांच्या पगारात तीन कंत्राटी कर्मचारी काम करत असतात मग सरकारने हाही विचार करावा की, एका आमदाराच्या पगारावर किती कला क्रीडा संगणक शिक्षक काम करू शकतील', असा सवाल आंदोलक शिक्षकांनी उपस्थित केला. शिवाय शासन वेळोवेळो आम्हा शिक्षकांची दिशाभूल करत असून आमच्यासारख्या हातावरच्या शिक्षकांनी कस जगायचं? संसार कसा चालवायचा? असं सांगत आंदोलक शिक्षकांनी आपल्या प्रश्नांना वाचा फोडली.

नाशिक शहरातील ईदगाह मैदानावर महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांमधील आदिवासी विभागातील कंत्राटी कला, क्रीडा, संगणक शिक्षक कृती समितीच्या वतीने आंदोलन



करण्यात येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कंत्राटी कला, क्रीडा, संगणक शिक्षक मानधन तत्वावर काम करत आहेत. मात्र आता शासनाकडुन खासगी कंपनीच्या माध्यमातून पदे भरली जाणार असल्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे या शिक्षकांवर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली असून शासनाने याबाबत विचारपूर्वक निर्णय घ्यावा अशी मागणी आंदोलक शिक्षकांनी केली आहे. कला क्रीडा संगणक शिक्षकांची आजही आदिवासी विभागात नितांत आवश्यकता आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शाळेवर अनुपस्थिती असल्याने 'सर तुम्ही केव्हा येणार' असा प्रश्न विद्यार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे. साधारण २०१८ पासून आम्ही आदिवासी विभागातील कला क्रीडा आणि संगणक विभाग शिक्षक म्हणून कंत्राटी पद्धतीने काम करत आहोत. संपूर्ण महाराष्ट्रातील कला, क्रीडा संगणक शिक्षकच्या नियुक्ती आदेशात एकत्रितपणा असणे आवश्यक आहे. क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तोंडावर येऊन ठेपल्या असताना सदर शिक्षकांच्या नियुक्ती अभावी आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून याचा परिणाम त्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर व सर्वांगीण विकासावर होत आहे. मूलभूत शिक्षणाशिवाय आदिवासी विद्यार्थ्यांचा जगण्याचा हक्क अर्धवट राहू शकतो.

# उद्धव ठाकरे अन् शरद पवारांनी महाराष्ट्राचा जीव घेतला: आशिष शेलार यांचा हल्लाबोल

**मुंबई।** महाराष्ट्र आजही गुंतवणुकीत नंबर वन आहे. राज्याचा जीव उद्धव ठाकरे आणि काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने घेतला. त्यांनी राज्यातील उद्योग बाहेर काढले, नानारला विरोध केला, नवीन विमानतळाला विरोध करणारे देखील हेच आहेत, असा आरोप शेलार यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर केला आहे.दरम्यान आशिष शेलार म्हणाले की, पत्राचाळ घोटाळा करून आमचा पक्ष चालत नाही. कोविड खिचडी घोटाळा करून आमचा पक्ष चालत नाही. आम्ही आमच्या पक्षाच्या खर्चाचा हिशेब निवडणूक आयोगाकडे देत असतो, असे म्हणत त्यांनी संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे. भाजप आमदार तथा नेते आशिष शेलार पुढे बोलताना म्हणाले की, शिवाजी महाराजांनी वापरलेली वाघनखे भारतात आणण्याचा तीन वर्षांचा करार करण्यात आला आहे. मुंबई, सातारा, नागपूर आणि कोल्हापूरमध्ये ही वाघनखे नेणार. राज्यात जे आजपर्यंत टवाळखोर होते पण आज ते शंकेखोर झाले.

# अखेर चिमुकल्यांना मिळाले आपले हक्काचे गुरुजी..!

### दोंदवाड ग्रामस्थांच्या व शालिनी भदाणे यांच्या मागणीला यश

**धुळे । प्रतिनिधी**

दोंदवाड (ता.धुळे) येथील जिल्हा परीषद शाळेत एक शिक्षक कमी असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या ठिकाणी तात्काळ एका शिक्षकाची नेमणूक करा अशा आशयाची मागणी, जि.प.सदस्या शालिनीताई बाळासाहेब भदाणे यांनी जि.प.चे सीईओ शुभम गुप्ता यांचेकडे शुक्रवारी (दि.६) प्रत्यक्ष भेटून केली होती. दरम्यान काल(दि.११) ग्रामस्थ व पदाधिकारींनी विद्यार्थ्यांसह जि.प.गाठली व सीईओ साहेबांसमोर आपले गार्हाणे मांडले. ग्रामस्थांची अन् चिमुकल्यांची



**बोरीपट्ट्यासह धुळे तालुक्यातील ज्या-ज्या मराठी शाळांवर शिक्षकांची संख्या कमी आहे, त्या-त्या ठिकाणी शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर प्रयत्न करण्यात येईल. जेणेकरुन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होणार नाहीत. यासाठी आवश्यक पाठपुरावा पुढच्या काळात करण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल राहू. - शालिनी बाळासाहेब भदाणे,** जि.प.सदस्या, बोरकुंड गट

मागणी व शालिनीताई भदाणे यांचा पाठपुराव्याची दखल घेत आज(दि.११) तात्काळ दोंदवाड शाळेवर शिक्षकाची नेमणूक करण्यात आली. चिमुकल्यांना आपले हक्काचे गुरुजी मिळाल्याने ग्रामस्थातून समाधान व्यक्त करण्यात आले. आज संजय पोपट पाटील हे प्राथमिक शिक्षक दोंदवाड शाळेवर रुजू झाले. यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी राकेश साळुंखे, जि.प.चे शिक्षण सभापती महाविरसिंग रावल, माजी कृषी सभापती संग्राम पाटील, दोंदवाड उपसरपंच गंगुबाई माळी, ग्रा. पं. सदस्य रवींद्र बिऱ्हाडे, विक्रम माळी, संजय बनसोडे, धर्मा माळी, कैलास माळी, हेमंत जाधव, बापूजी बोरसे, बोरकुंड जि. प. गटातील मौजे दोंदवाड येथील जि.प. मराठी शाळेत ७२ विद्यार्थी संख्या आहे. परंतू येथे सध्या फक्त २ शिक्षक कार्यरत होते. या ठिकाणी आवश्यक शिक्षक संख्या ३ आवश्यक असल्याने, विद्यार्थ्यांची गैर सोय होऊ नये यासाठी प्रती नियुक्तीवर गेलेल्या शिक्षकाच्या जागी नवीन शिक्षकांची नेमणूक करावी अशी मागणी बोरकुंड गटाच्या जिल्हा परिषद सदस्या शालिनीताई बाळासाहेब भदाणे यांनी दि. ६ ऑक्टोंबर रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता याची भेट घेत केली होती. तसेच यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र बोरकुंड येथे दररोज १०० ते १२० रुग्णांची ओपीडी होत असते. परंतु कर्मचाऱ्यांची कमतरता व काही औषधांचा नेहमीचा तुटवडा लक्षात घेता रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. तरी आपण संबंधित अधिकार्यांना सुचना करून समस्या निकाली काढाव्यात. मौजे रतनपुरा येथे जि. प. मराठी शाळेत पटसंख्येअभावी कमी केलेल्या एका शिक्षकांची प्रती नियुक्ती करावी, अशा आशयाच्या मागणीही जि.प.सदस्या शालिनीताई बाळासाहेब भदाणे यांनी केली होती. यावेळी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकार्यांनी या मागणीस सकारात्मक प्रतिसाद दिला होता. दरम्यान काल ग्रामस्थ व पदाधिकारींनी विद्यार्थ्यांना घेऊन जि.प.गाठले होते. यावेळी ग्रामस्थांनीही आपले याबाबत गार्हाणे मांडले होते. ग्रामस्थ, चिमुकले बालक व शालिनीताई भदाणे यांच्या मागणीची तात्काळ दखल घेत आज दोंदवाड जि.प.शाळेवर शिक्षकाची नेमणूक करण्यात आली. यावेळी ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# 'तहसील'मधील खासगी पंटर रितेश 'एसीबी'च्या ताब्यात

**धुळे । प्रतिनिधी**

शिंदखेडा तहसील कार्यालयातील खासगी पंटर रितेश अरुण पवार याला १४ हजारांची लाच घेताना शिंदखेडा येथील पाटण रस्त्यावरील पेट्रोलपंपाजवळ रंगेहाथ पकडण्यात आले. धुळे येथील लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने कारवाई केली. शिंदखेडा पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्ह्याची नोंद करण्याचे काम सुरू होते.

डांगुर्णे येथील तक्रारदार यांच्या मालकीची गावशिवारात शेतजमीन आहे. शेतजमिनीचे खातेफोड करण्यासाठी तक्रारदार तहसील कार्यालयात कागदपत्रे घेऊन आले असता खासगी पंटर रितेश पवार याच्याशी भेट झाली. खातेफोड करून देण्यासाठी तक्रारदार व सहधारक यांना ४ ऑक्टोबरला बोलावले. खातेफोड प्रकरणाचे कामकाज करून दिले. कार्यालयातील नायब तहसीलदार, अधिकारी व कर्मचारी यांच्याशी माझे घनिष्ठ संबंध आहेत. तहसीलदार यांचा आदेश काढण्यासाठी २० हजारांची मागणी केली. तक्रारीच्या अनुषंगाने ६ ऑक्टोबरला शिंदखेडा तहसील कार्यालयात जाऊन पडताळणी केली असता तडजोडीअंती १४ हजार रुपयांची मागणी केली. शिंदखेडा येथे मंगळवारी पंचांसमक्ष १४ हजार रुपयांची लाच घेताना रितेश रंगेहाथ मिळून आला.

## जातगणना आणि मतगणना

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी कोणते मुद्दे मतदारांसमोर घेऊन जायचे आणि त्यांना कौल लावायचा, याची तयारी वर्षभर तरी आधी सुरू होतेच. काँग्रेसने आता जातगणनेचा मुद्दा लावून धरला असला तरी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आपल्या राज्यातील जातगणनेचे आकडे जाहीर करून या विषयाला गती दिली होती. आता काँग्रेसने तर कार्यकारिणीत जातगणनेची औपचारिक मागणीच केली आहे. काँग्रेसची सत्ता असणाऱ्या राज्यांमध्ये जातगणना केली जाईल, असेही राहुल गांधी यांनी जाहीर केले आहे. 'इंडिया' या विरोधकांच्या आघाडीतील काही पक्षांकडेही काही राज्यांमधील सत्ता आहे. इतर विरोधी पक्षही ही कल्पना उचलून धरतील, ही राहुल गांधी यांची अपेक्षा चूक नाही. तशी अनौपचारिक चर्चा आधी झालीही असू शकते. भारतीय जनता पक्षाने काँग्रेस कार्यकारिणीच्या ठरावावर पहिली प्रतिक्रिया देताना इतकी वर्षे काँग्रेसच्या हातात देशाची सत्ता असताना जातगणना का केली नाही, असा सवाल केला आहे. तो योग्य आहे. मात्र, हे काँग्रेसच्या आजच्या रणनीतीला उत्तर होऊ शकत नाही. इंग्रजांनी देश पारतंत्र्यात असताना १९३१ मध्ये जातवार जनगणना केली होती. तेव्हा ती सारी आकडेवारी जाहीर करण्यात आली होती. पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी पहिले जनता सरकार असताना जानेवारी १९७९ मध्ये विविध जातींमधील सामाजिक, शैक्षणिक मागासलेपण शोधण्यासाठी मंडल आयोग नेमला होता. तेव्हाही सरकारने नव्याने जातगणना केलीच नाही. जुनाच सगळा तपशील वापरून मंडल आयोगाने अहवाल दिला. तो पुढे १२ वर्षांनी बासनातून बाहेर काढण्यामागचा तेव्हाचे पंतप्रधान व्ही. पी. सिंह यांचा हेतूही कितपत पारदर्शक होता, याची शंकाच आहे. हा सगळा इतिहास नोंदवायचे कारण म्हणजे देशातील जातवास्तवाचा राजकीय वापर करण्याची रीत किती जुनी आहे ते लक्षात यावे. मंडल आयोगाचा अहवाल बाहेर आला नसता तर अयोध्येच्या आंदोलनात भाजप उतरलाही नसता. खुद्द लालकृष्ण अडवाणी यांनीही ही संगती मान्य केली होती. जातींना न्याय न देता नुसतेच राजकारण करण्याचा उद्योग पुढे कुठल्या दिशेने जाईल; हे काल सांगता येत नव्हते आणि आजही सांगता येत नाही.

'तुमच्यापैकी कोण कोण ओबीसी आहे' असा प्रश्न पत्रकारांना पत्रकार परिषदेत विचारणे सोपे आहे. त्यापेक्षा आत्मपरीक्षण करून आपण किंवा आपल्या पक्षाने ओबीसी किंवा अतिमागास समाजांसाठी नेमके काय केले, असा प्रश्नही विचारला गेला पाहिजे. काँग्रेसच्या सर्व मुख्यमंत्र्यांनी आता आपापल्या राज्यात जातगणना करण्यास मान्यता दिल्याचे राहुल गांधी यांनीच म्हटले आहे. आता भाजपलाही हा मुद्दा टाळून पुढे जाता येणार नाही. २०२१ मध्ये अपेक्षित असणारी जनगणना अनेकदा पुढे गेली. करोनाचे कारण संपले असले तरी ती आजही सुरू झालेली नाही. कार्यक्षम केंद्र सरकारच्या मनात या विषयी काय आहे, ते कळायला मार्ग नाही. आता जेव्हा जनगणना होईल, तेव्हा कमालीची काळजी घेऊन, नागरिकांकडची कागदपत्रे व पुरावे तपासून आणि सर्व अत्याधुनिक तंत्रवैज्ञानिक साधनांची मदत घेऊन अचूक जातगणना करण्यास दुसरा काही पर्याय आजतरी दिसत नाही. आज विविध समाज घटकांना देण्यात आलेला आरक्षणाचा वाटा योग्य आणि त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आहे किंवा नाही, हेही कळायला मार्ग नाही. १९३१ ची जातगणना योग्यच होती हे कशावरून आणि तेव्हापासून जवळपास शंभर वर्षांमध्ये समाजातील विविध जातींची टक्केवारी आणि प्रमाण तेवढेच राहिले असेल, असा समज करून घेणेही अशास्त्रीय आणि सत्यापासून पळ काढणारे आहे. मंडल आयोगाने ओबीसी म्हणजे इतर मागासवर्गियांचे लोकसंख्येतील प्रमाण ५२ टक्के असावे, असे म्हटले होते. त्यानंतर नॅशनल सँपल सर्व्हेने ही टक्केवारी ४२ असल्याचे म्हटले होते. हा फरक मोठा आहे. आज देशात ओबीसींच्या एकूण दोन हजार ६३३ जाती नोंदविल्या गेल्या आहेत. त्यांची सर्वच राज्यातील स्थिती सारखी नाही. तसेच, काही जाती विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या श्रेणीतही जाऊ शकतात. मोदी सरकारने ओबीसींमधल्या अंतर्गत आरक्षणात अतिमागास जातींवर अन्याय होऊ नये, यासाठी राष्ट्रपती कोविंद यांनी २०१७ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजी मुख्य न्यायमूर्ती जी.रोहिणी यांचा आयोग नेमला होता. १४ वेळा मुदतवाढ मिळाल्यानंतर न्या. रोहिणी यांनी अलीकडेच हा अहवाल केंद्र सरकारला सादर केला आहे. आता सरकार हा अहवाल स्वीकारणार आहे की नाही, हे अजून समजलेले नाही. तो जाहीरही झालेला नाही. काँग्रेसच्या नव्या भूमिकेमुळे या अहवालालाही वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. देशातील सर्वच घटकांना मिळणारे आरक्षण आणि त्यांतील फेरबदल किंवा फेरआखणी हा खरेतर राष्ट्रीय महत्त्वाचा मुद्दा मानून सर्व राजकीय पक्षांनी तो निवडणुकीच्या राजकारणाच्या बाहेर ठेवायला हवा. मात्र, सगळ्यांच पक्षांना जातगणनेइतकीच किंवा त्याहूनही अधिक मतगणना महत्त्वाची वाटते. मात्र, यावरून देशात जे काही सौहार्द टिकून आहे; ते संपवू नका, इतके मात्र आग्रहाने सांगायला हवे.

## नांदेड शासकीय रुग्णालयातील मृत्यूंनंतरचे राजकारण

नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात एकाच दिवशी २४ रुग्णांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये बारा नवजात बालकांचा समावेश होता. ही बातमी जशी बाहेर पडली, त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विरोधी पक्षनेते, पालकमंत्री, स्थानिक आमदार, खासदार यांच्यासह अनेकांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले व घटनेची संपूर्ण चौकशी झाली पाहिजे, असे मत व्यक्त केले. या सर्व प्रकरणात हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील यांच्या मताशी सहमत असणाऱ्यांनी व अधिष्ठाता डॉ. एस. आर. वाकोडे यांनी एकमेकांविरुद्ध दिलेल्या पोलीस तक्रारींचे व त्यानंतर दाखल झालेल्या गुन्ह्यांमुळे संपूर्ण महाराष्ट्रात चर्चेला वेगळेच वळण मिळाले आहे. मृत्यूच्या तांडवाबरोबरच नंतरच्या राजकारणाने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधले आहे.

पूर्वी नांदेडला असलेल्या शासकीय रुग्णालयाचे नाव श्री गुरुगोविंद सिंघजी शासकीय रुग्णालय असे होते. शहराच्या मध्यभागी म्हणजेच रेल्वे स्थानक व बसस्थानकापासून पूर्वीचे रुग्णालय हे केवळ आठ ते दहा मिनिटांच्या अंतरावर होते. अपुरी जागा या कारणावरून ते रुग्णालय गावाच्या बाहेर स्थलांतरित करण्यात आले व त्याचे नाव डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय असे देण्यात आले. खरे पाहिले तर नांदेडमध्ये दवाखान्यांचे मोठे टोळकेच आहे. रुग्णांची लूट व स्वतःचा गल्ला भरणे एवढेच काम नांदेडच्या खासगी रुग्णालयात केले जाते, असा अनुभव हजारो रुग्णांना आलेला आहे. खासगी रुग्णालयांना मोठे करण्यासाठी तसेच डॉक्टरांच्या मर्जिखातरच शासकीय रुग्णालय गावाबाहेर हलविण्यात आले, असा आरोप काही तज्ज्ञ डॉक्टर मंडळींमधून पूर्वीच झाला होता. पूर्वीचे शासकीय रुग्णालय पन्नास हजार स्क्वेअर फूट एवढ्या जागेत होते. नंतरचे स्थलांतरित केलेले डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे त्यापेक्षा दुप्पट जागेत बांधण्यात आले. प्रत्यक्षात शहरात असलेल्या रुग्णालयात सुरुवातीला डॉक्टर मंडळी तसेच नर्स, ब्रदर व इतर कर्मचाऱ्यांची जेवढी संख्या होती, त्यापेक्षा किमान दुप्पट संख्या नवीन शासकीय रुग्णालयात असणे गरजेचे होते. सरकार कोणाचेही असो, सत्तेवर कोणीही असो; परंतु रुग्णालय म्हटले की, त्या ठिकाणी डॉक्टरांची अपुरी असलेली संख्या तसेच तृतीय व चतुर्थ श्रेणीची कर्मचारी भरती होणे अत्यंत गरजेचे होते. शासनाकडे यासाठीचा पाठपुरावा स्थानिक नेतृत्वाने करणे गरजेचे होते. ज्याप्रमाणे शहराच्या मध्यभागी असलेल्या दवाखान्याचे स्थलांतर तसेच मोठ्या प्रमाणात बांधकाम करून घेण्यासाठी ज्या राजकीय पुढाऱ्यांनी पुढाकार घेतला त्याच पुढाऱ्यांनी जर दवाखान्यात पुरेसे डॉक्टर तसेच इतर कर्मचारी वर्ग भरून घेण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केला असता, तर कदाचित लहान बालकांसह एकाच दिवसात २४ जणांच्या मृत्यूचा दिवस उजाडला नसता, हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही.

नांदेडचेच नव्हे तर महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात संपूर्ण सुविधा नाहीत. तसेच तेथील स्वच्छतेच्या



बाबतीत कोणीही नव्याने सांगण्याची गरज नाही. नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात ६०० खाटांची मंजुरी आहे तर प्रत्यक्षात रुग्णालयात ९००च्या वर रुग्णांची भरती असते. 'एका हाताने टाळी वाजत नाही' ही म्हण मराठीत प्रचलित आहे. त्याचप्रमाणे कोणताही शासकीय अधिकारी, कर्मचारी हा किती इमानेइतबारे सेवा करतो हे तुम्ही-आम्ही सर्वजण उघड्या डोळ्यांनी पाहतो. नांदेडच्या शासकीय रुग्णालयात जो मृत्यूच्या तांडवाचा दुर्दैवी प्रकार घडला त्यामुळे त्यानंतर लगेच खासदार हेमंत पाटील यांनी रुग्णालय परिसराला भेट दिली. त्यावेळी सर्वांचे हृदय हेलावले. त्या ठिकाणी स्वच्छतागृह अतिशय वाईट अवस्थेत होते. तेथील अस्वच्छता पाहून खा. हेमंत पाटील यांनी अधिष्ठाता डॉ. एस. आर. वाकोडे व अन्य एका डॉक्टरांकडून तेथील साफसफाई करून घेतली. या कृत्यानंतर जनमानसातून रोष व्यक्त करण्यात आला; परंतु नंतर हे प्रकरण थेट ॲट्रॉसिटी दाखल करण्यापर्यंत गेले. या मध्ये झालेले राजकारण हे काहीसे वेगळेच आहे, अशी चर्चा नांदेडमध्ये होत आहे. खा. हेमंत पाटील यांच्या समर्थकांनी पोलीस स्थानकात अधिष्ठाता डॉ. एस. आर. वाकोडे व अन्य एकाविरुद्ध 'रुग्णांच्या मृत्यूला कारणीभूत' अशी तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी डॉक्टरांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला.

नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील मृत्यूच्या तांडवाचा प्रकार वेगळाच राहिला; परंतु त्यानंतर झालेल्या ॲट्रॉसिटी व सदोष मनुष्यवधाचा गुन्हा यामुळे राजकारण ढवळून निघाले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात डॉक्टर व त्यांच्या संघटना खासदारांच्या कृतीची निंदा करत मोर्चे काढत आहेत. या घटनेमागची एक बाजू ही देखील आहे की, शासकीय रुग्णालयात असलेली अस्वच्छता व त्या ठिकाणी असलेले तृतीय व चतुर्थ श्रेणी गटातील कर्मचारी कामाला बगल देत केवळ शासकीय पगार लाटतात. याबाबत लोकप्रतिनिधी म्हणून खासदारांनी उपस्थित केलेला प्रश्न चुकीचा नव्हता, शेवटी अधिष्ठाता म्हणून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांकडून कामे करून घेणे शासकीय कर्तव्याचा भाग आहे. खासदार हेमंत पाटील हे मुळात शिवसैनिक आहेत. ते ज्या वेळी रुग्णालयात गेले होते त्यावेळी त्यांच्या आजूबाजूला नेते आले म्हणून अनेक नातलगांनी गर्दी केली होती. दुर्दैवी घटनेत कोणाचे बाळ दगावले होते तर कोणाचे घर उघड्यावर आले होते. काहींनी आई-वडिलांना गमावले होते. मृत्यूचे तांडव व झालेला सर्व प्रकार तेथे जमलेले रुग्ण व त्याचे नातलग लोकप्रतिनिधी म्हणून हेमंत पाटील यांच्या कानावर टाकत होते. त्या भावनेतून व तेथील अस्वच्छता पाहून खासदार हेमंत पाटील यांनी अधिष्ठाता व डॉक्टरांकडून साफसफाई करून घेतली.

डॉक्टरांनी साफसफाई केल्यानंतर त्या ठिकाणी स्वतः खासदार हेमंत पाटील यांनी हातात पाइप घेऊन ती घाण धुऊन काढली, हे चित्र तेथे उपस्थित असलेल्या सर्वांनीच पाहिले. रुग्णालयात साफसफाई करण्याचे काम अधिष्ठाताचे नाही हे देखील तेवढेच खरे आहे. त्या प्रकाराने संतप्त झालेल्या डॉक्टरांनी 'स्टंटबाजी' असे म्हणून या प्रकरणाला वेगळेच वळण दिले. यामध्ये जातीचे राजकारण आणण्यात आले व खासदारांविरुद्ध ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला, असे मत या प्रकारानंतर व्यक्त होत आहे. ज्या दिवशी मृत्यूचे तांडव झाले त्या घटनेच्या एक दिवस अगोदर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनावरून सर्वत्र स्वच्छतेची मोहीम राबविण्यात आली होती; परंतु ही मोहीम जर रुग्णालयात केली असती तर कदाचित हा प्रकार देखील घडला नसता. एकाच दिवसात २४ रुग्णांचा मृत्यू होणे खूपच वाईट आहे. खरे तर या प्रकरणावर चर्चा होऊन त्यावर तोडगा काढणे गरजेचे होते; परंतु राजकीय मंडळींनी दोन्ही प्रकारांना उचलून धरत मूळ मुद्द्याला बगल दिली. सत्ताधारी व विरोधी पक्षांनी यावरून राजकारण करत मूळ मुद्दा बाजूला ठेवला. कोणीही गोरगरिबांच्या मदतीसाठी धावून आले नाही, हे विदारक चित्र येथील राजकारणी मंडळींना उघडे पाडणारे आहे.

विशेष म्हणजे डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय ज्या भागात आहे त्या नांदेड दक्षिणचे नेतृत्व काँग्रेसचे आमदार मोहन अण्णा हंबर्डे हे करतात. त्यांच्या घरापासून जवळच हे शासकीय रुग्णालय आहे व तेथून जवळच विष्णूपुरी धरण आहे, ज्यामधून संपूर्ण नांदेडला पाणीपुरवठा होतो; परंतु शासकीय रुग्णालयात कधीही नियमित पाणीसाठा उपलब्ध नसतो व रुग्णांना दुपारी दोनपर्यंत पाणी मिळत नाही, अशी परिस्थिती असताना काँग्रेसचे आ. हंबर्डे यांनी किती वेळेस त्या रुग्णालयात जाऊन पाहणी केली हा एक संशोधनाचाच विषय आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या वडिलांच्या नावावर असलेल्या या शासकीय रुग्णालयाची अवस्था त्यांनी किती वेळेस सभागृहात मांडली, हा विषय त्यांनी सभागृहात मांडला असेल तर त्यांचे प्रयत्न कुठे कमी पडले, याचे आत्मपरीक्षण त्यांनीच करावे, लोकप्रतिनिधी म्हणून सत्ताधारी व विरोधक या दोघांनीही यावर चर्चा करणे गरजेचे होते. मृत्यूच्या तांडवानंतर आता सर्वजण या विषयावर लक्ष केंद्रित करत आहेत. काहीही असो नांदेडमध्ये ज्यांचा जीव गेला त्यांच्या कुटुंबीयांना जावून दुःख विचारा. निगरगट्ठ झालेली ही राजकारणी मंडळी आजपर्यंत झोपली होती काय, असा सवाल सर्वसामान्य नागरिक उपस्थित करीत आहेत.

## भ्रष्टाचाराच्या दलदलीत 'आप'

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारमुक्तीच्या चळवळीतून जन्माला आलेल्या आम आदमी पक्षाबद्दल देशातील जनतेच्या अपेक्षा प्रचंड वाढल्या होत्या; परंतु 'आप'चे पायही मातीचेच असल्याचे स्पष्ट झाले. मद्य घोटाळ्यासह मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाच्या डागडुजीवर झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या खर्चामुळे 'आप'बद्दल साशंकता निर्माण झाली असून आता खासदार संजय सिंह यांना झालेली अटक 'इंडिया' आघाडीवरही परिणाम करू शकते.


स्वच्छ चारित्र्याचे प्रमाणपत्र घेऊन राजकारणात उतरलेल्या आणि दोन राज्यांमध्ये सत्तेवर आलेल्या 'आप'च्या कथित गैरव्यवहारामुळे काही मंत्री तुरुंगात आहेत. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याभोवतीही मद्य घोटाळ्याचे वादळ घोंघावते आहे. त्यातच आता खासदार संजय सिंह यांना 'ईडी'ने अटक केली. दारू घोटाळ्याप्रकरणी दहा तासांच्या प्रदीर्घ चौकशीनंतर त्यांना अटक करण्यात आली. मद्यावरील सीमाशुल्क तपास प्रकरणात प्रमुख आरोपी दिनेश अरोरा तपास यंत्रणांचा साक्षीदार बनल्यानंतर संजय सिंह यांना अटक करण्यात आली आहे. 'आप संजय सिंह यांना क्रांतिकारकाच्या स्वरूपात पाहते. ते घाबरले नाहीत आणि घाबरणारही नाहीत. अन्यायाविरुद्ध लढत राहणार,' असे या पक्षाने म्हटले आहे. केजरीवाल यांनी संजय सिंह यांची अटक बेकायदेशीर ठरवली आहे. माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या अटकेनंतर संजय सिंह हे आम आदमी पक्षातील अरविंद केजरीवाल यांच्यानंतरचे दुसरे मोठे नेते होते. आम आदमी पक्षाच्या राजकीय व्यवहार समितीचे सदस्य असण्याबरोबरच संजय सिंह हे पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्तेदेखील आहेत. याशिवाय उत्तर प्रदेश-बिहारमध्ये पक्षाची धुरा त्यांच्याकडे आहे. संदीप पाठक यांच्यासह ईशान्येकडील आणि देशातील इतर राज्यांमध्ये संघटना उभारण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीमध्ये आम आदमी पक्षाचा चेहरा असणारे संजय सिंग समन्वयाची जबाबदारीही सांभाळतात. पक्षाच्या प्रत्येक निर्णयाप्रसंगी त्यांचे म्हणणे ऐकायला मिळते. इतर पक्षनेत्यांच्या भेटीगाठींमध्येही आणि निवडणूक रणनीती-पक्षाची समीकरणे ठरवण्यातही त्यांची भूमिका महत्त्वाची असते.

संजय सिंह यांच्या अटकेमुळे 'आप'ला झटका बसला. सिसोदिया यांच्या अटकेनंतर आम आदमी पक्षाला बसलेला हा दुसरा मोठा धक्का आहे. हा धक्का 'आप'चे राष्ट्रीय संयोजक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यापेक्षा पक्षासाठी अधिक आहे. कारण सिसोदिया यांच्या अटकेनंतर संजय सिंह केजरीवाल यांचे 'सेकंड इन कमांड' बनले होते. पक्षाच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या संजय सिंह यांच्या खांद्यावर होत्या. ते उत्तर प्रदेशचे आहेत. २०११ मध्ये ते हजारे यांच्या दिल्लीतील भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात सामील झाले. नोव्हेंबर २०१२ मध्ये आम आदमी पक्षाची स्थापना झाली तेव्हा ते मुख्य सदस्यांपैकी एक होते. संजय सिंह हे आम आदमी पक्षाचे सर्वात बोलके नेते मानले जातात. त्यामुळे पक्षाच्या वतीने अनेक मुद्द्यांवर उघडपणे बोलतात. हिंदी भाषिक राज्यांच्या राजकारणात त्यांची सक्रियता स्पष्टपणे दिसून येते. उत्तर प्रदेशच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत संजय सिंह यांच्यामुळे 'आप'चे खाते उघडले. पक्षाची रणनीती आणि बैठकांमध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. गाझियाबाद, कौशांबी, फिरोजाबाद, बदायूंसह उत्तर प्रदेशमधील अनेक जिल्ह्यांमध्ये आम आदमी पक्षाने विजय मिळवला होता. गेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र या पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. संजय सिंह यांची राजकीय समज चांगली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्यांनी काँग्रेससह बिगरभाजप पक्षांशी संबंध प्रस्थापित केले. ते केजरीवाल यांच्यासोबत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी तसेच उद्धव ठाकरे यांच्या भेटी घेतात.

संसदेत वेगवेगळे मुद्दे मांडणारा पक्षाचा सर्वात मोठा चेहरा म्हणून त्यांची ओळख आहे. मणिपूर हिंसाचार, हाथरस बलात्कार प्रकरण, कोरोना, बेरोजगारी, अल्पसंख्याकांचे प्रश्न, शेतकऱ्यांचे आंदोलन आदी अनेक मुद्द्यांवर संजय सिंह राज्यसभेत आवाज उठवताना दिसत राहिले. केजरीवाल यांनी मुख्यमंत्री होण्यापूर्वी जनतेला मोठी आश्वासने दिली. स्टेडियममध्ये शपथ घेतली, रस्त्यावर रात्र काढली. पण, कामाची संधी मिळताच त्यांनी मैदान सोडून पळ काढला. या नेत्यामुळे अडचणी कमी होतील आणि भ्रष्टाचाराच्या आरोपातून सुटका होईल, अशी लोकांची अपेक्षा होती; परंतु आज जनतेला तसा अनुभव येत नाही. दिल्लीमध्ये मिळालेल्या संधीचे पक्षाने भांडवल केले असते तर परिस्थिती बदलू शकली असती. 'आप'ने भ्रष्टाचाराविरोधात मोठी मोहीम उघडली तेव्हा केजरीवाल 'सोशल मीडिया'पासून सर्वसामान्यांच्या हृदयापर्यंत पोहोचले. आपण पंतप्रधानपदाचे दावेदार होऊ शकतो, असे त्यांना वाटू लागले आणि येथून त्यांची मोहीम फसली. भ्रष्टाचाराऐवजी मोदींविरोधी आवाज त्यांच्या ओठांवर सातत्याने दिसू लागला. कदाचित त्यामुळे आपण देशात भाजपला पर्याय देण्यात यशस्वी होऊ, असे त्यांना वाटले असावे. **क्रमशः**

**- अजय तिवारी**

## शब्दकोडे-२०२



**आडवे शब्द**

१. उत्तराधिकारी ६. सुस्ती, कंटाळा ८. दोन रत्ने १०. ज्ञानेश्वरांची प्रार्थना १२. चिंतन १३. निमग्न १४. भूतांचा राजा १६. हिंमत, धैर्य १७. चहासाठी 'ड्बशी' १९. तऱ्हा २१. संतोष, आनंद २३. ठोक! हाण २५. सैन्याचा मालपुरवठा २७. माणूस २९. चणचण, दुर्भिक्ष्य ३०. येणारा समय ३२. गंध ३३. सोने ३४. देव ३७. हरकत, बंदी ३८. जवळचे संबंध, दाट मैत्री ४०. श्रेष्ठ पुरुष ४१. पचविणारा ४३. मिठी ४५. पायात चप्पल न घालता ४७. पटकन ५०. काळाकुट्ट ५२. हिंदीत जन्म ५४. धमनी ५५. रामदासस्वामींचा जन्मदिवस ५८. माळ ५९. कणीदार ६१. वसन, वस्त्र ६३. पुरुष ६४. पत्रातील साष्टांग नमस्कार विनंती विशेष ६६. समाजातील प्रतिष्ठा ६७. नवरदेव ६९. हिंदीत बासरी ७०. युद्ध ७२. अत्यंत मऊ धाग्याचे कापड ७४. वाळूवर रेघा मारून भविष्य सांगण्याची विद्या ७६. जनावर वगैरे सांभाळणे ७७. पुण्याचा नागरिक ७८. सामान ८०. तोंडी लावण्याचा एक पदार्थ प्रकार ८३. म्हशीचे पिलू ८४. दक्ष ८५. चाफा

**उभे शब्द**

१. उपयोग २. एक पाताळ ३. आठवण ४. गुंड, मोठा भाऊ ५. विमानांची धावपट्टी (इंग्रजी) ६. नभ ७. अगदी सारखे ८. सन्मानाची रक्कम ९. बडबड, वटवट, त्रास १०. धनुष्यबाण १५. शक्ती, बळ १८. अनुमती २०. फणसाची एक जात २१. वहीत मोकळी सोडलेली उभी जागा २२. पळणे २४. फायदा २६. लोखंडी खांब २८. उगीच २९. लाकूड चिरण्याचे एक हत्यार ३१. विसराळू ३२. घाव, प्रहार ३५. श्वासोच्छ्वास ३६. हलकट ३९. चमक, मुरगळा ४१. जल ४२. प्रेतावरील वस्त्र ४४. पक्के आश्वासन ४५. लोकांस जेवावयास घालणे ४६. लिहिलेले वाचणे ४८. रेशीमाचे जाडसर कापड ४९. अजाणता ५०. कावळ्याचे ओरडणे ५१. दार ५२. वतनदार ५३. कॉलेज (मराठी) ५६. गव्हाची एक उत्कृष्ट जात ५७. व्रत ६०. उपयोगात आणणे ६२. माघारी येणे, तव्यावर उलटून भाजणे ६५. आजूबाजूला ६८. एकरुप ७१. घाण ७३. अर्धांगवायू ७५. हिंदीत घर ७७. परत ७८. मत्स्य ७९. अंगावरील बारीक केस ८१. सडक, मार्ग ८२. सहापट

### शब्दकोडे २०१ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.सलवार कमीज ओढणी ६.अटकळ ९.मन १०.जममानस ११.सरसरीत १३.राखरांगोळी १५.दावा १७.गदा १८.रस २०.डाग २१.स्थगित २२.रव २४.रमताराम २७.गोवा ३०.नकारघंटा ३१.दर, दाम ३३.तलम ३५.ललना ३६.कानी कपाळी ओरडणे ३९.भान ४०.अवांतर ४१.पार ४२.पद ४३.कणीदार ४५.रमा ४७.रवा ४८.विनाकारण ५१.मणेर ५२.वाहनतळ ५३.साव ५४.पावा ५५.सकल ५६.अप्पलपोटी ५९.परसदार ६०.वहिवाट ६२.कलम ६४.नवनीत ६५.रास्त ६७.प्राण ६८.मीठ ६९.वरमाय

**उभे उत्तर**

१.सरस २.वारसदार ३.कमतरता ४.मीन ५.ओरखडा ६.अमानत ७.टन ८.कसदार १०.जळी स्थळी काष्टी पाषणी १२.रग १४.रांगणे १६.वावटळ १९.सराईत २३.अगोदर २५.मलमल २६.खोटा २८.वार २९.अमकातमका ३२.दालन ३४.अडसर ३७.नीर ३८.ओसरणे ३९.भारवाहक ४१.पारवा ४२.परतपरत ४३.कणव ४४.दामदुप्पट ४६.मारवा ४९.नामकरण ५०.रसा ५४.पाटील ५५.सदा ५६.अवास्तव ५७.पोक ५८.मानव ५९.पनीर ६१.हिरा ६३.मजल ६६.सीमा

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# संगीतसुर्य केशवराव भोसले यांचे कार्य नव्या पिढीला नेहमीच प्रेरणादायी

## संगीतसुर्य केशवराव भोसले राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. सतीश पावडे यांचे प्रतिपादन

नाशिक । अजय भोसले

संगीतसुर्य केशवराव भोसले यांनी संगीत भूमीवर गायक, दिग्दर्शक, अभिनेता, नाट्यनिर्माता अशा कितीतरी भूमिका बजावत अजरामर काम केले असून त्यांचे हे सर्व काम ऐतिहासिक आणि क्रांतिकारी ठरले आहे. आजच्या कार्यक्रमाच्या ऐतिहासिक क्षणी त्यांचे वंशज उपस्थित आहेत. एवढेच नव्हे तर त्यांची चौथी पिढीही नाशकात आजच्या कार्यक्रमाला उपस्थित आहे. हे सर्व कौतुकास्पद आणि अभिमानास्पद आहे. अशा या एकमेव अद्वितीय ठरलेल्या संगीतसुर्य केशवराव भोसले यांचे कार्य हे नव्या पिढीला नेहमीच प्रेरणादायी मार्गदर्शक ठरणारे आहे असे प्रतिपादन संगीतसुर्य केशवराव भोसले राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. सतीश पावडे यांनी केले.

संगीतसुर्य केशवराव भोसले राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेतर्फे संगीतसुर्य केशवराव भोसले यांच्या १०२ व्या स्मृति समारोहनिमित्त नाशिक येथील गंगापूर रोडवरील राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये राष्ट्रीय सांस्कृतिक समारोह आयोजित करण्यात आला होता यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश पावडे हे बोलत होते. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रासह गुजरात, दिव दमण, राजस्थान,






**संगीतसूर्य केशवराव भोसले राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेने आयोजित संगीतसूर्य केशवराव भोसले यांच्या१०२ व्या स्मृति समारोहनिमित्त आयोजित राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेमध्ये संगीतसूर्य केशवराव भोसले यांचे वंशज असलेल्या कुटुंबातील सदस्यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच संगीत क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय अशी कामगिरी करणाऱ्या डॉ. पंडित भोजराज चौधरी यांना जीवन गौरव पुरस्काराने संगीतसुर्य केशवराव भोसले राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष दिलीप साळुंके यांच्या हस्ते सन्मानित आले. तसेच राष्ट्रपती युवा पुरस्कार विजेते प्रतिक माधव कदम यांना तर छत्तीसगडच्या प्रतिक्षा बाबर आणि अभिनेत्री भूमिका देसले यांनाही सन्मानपत्र देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.**

छत्तीसगड, मध्यप्रदेश, कर्नाटक, गोवा आदी राज्यांमधून पदाधिकारी आणि संगीतसुर्य केशवराव भोसले यांच्या साहित्य तसेच नाट्यकृतीवर प्रेम करणारे रसिक, चाहते उपस्थित होते.

डॉ. सतीश पावडे यांनी अतिशय अल्पायुषी ठरलेल्या संगीतसुर्य केशवराव भोसले यांच्या कारकिर्दीचा धांडोळा घेत उपस्थितांसमोर केशवराव भोसले यांचा जीवनपट मांडला. केशवराव भोसले यांनी आपल्या कारकिर्दीत विविधअंगी भूमिका बजावत भारतीय संगीतात एक अढळ स्थान प्राप्त केले असल्याचे सांगत त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आणि नव्या पिढीतील कलावंत, लेखक, गायक, गीतकार आदींना मार्गदर्शक ठरणारे असल्याचे सांगितले. देशभरातील बारा राज्यांमध्ये सांस्कृतिक परिषदेचे कामकाज सुरू असून युट्युब चॅनेल, फेसबुक पेज, कलादर्पण, पुस्तके, वेबसाईट, ब्रॉडकास्ट, ऑनलाईन कार्यक्रम आदी माध्यमातून केशवराव भोसले यांचे साहित्य आणि कार्य पुढे पर्यंत नेले जात असल्याचे सांगितले.

दरम्यान या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून प्राचार्य प्रशांत पाटील यांनी इतक्या वर्षानंतरही केशवराव भोसले यांचा १०२ वा स्मृति समारोह होणे ही अतिशय विशेष बाब आहे. असे सांगत सांस्कृतिक चळवळीने माणसे जोडली जातात, अंतर कमी होते, केशवराव भोसले यांचे साहित्य सर्वदूर पोहोचवण्यासाठी सर्वांनी हातभार लावावा असे आवाहन केले. यावेळी संगीतसूर्य ललित कला केंद्राचे उद्घाटन, संगीतसूर्य यांच्या पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले.

परिषदेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष दिलीप साळुंके यांनी प्रास्ताविकात सांगितले की, केशवराव भोसले यांचे नाट्य, संगीत हे देशाच्या विविध भागात पोहोचत आहे. आजच्या कार्यक्रमाचाही हाच मुख्य हेतू असून एखाद्या तेजस्वी ताऱ्याप्रमाणे केशवराव भोसले यांचा हा आविष्कार ठरला आहे. ज्यांना केशवराव भोसले यांना पाहायला आणि अनुभवायला मिळाले ते खरोखरच भाग्यवान आहेत. यावेळी प्रसिद्ध नाटककार दत्ता पाटील यांची प्रकट मुलाखत दिलीप साळुंके यांनी घेतली. दरम्यान दत्ता पाटील यांनी आपण कसे लिहिते झालो, केव्हांपासून नाटकं सुचली, शैक्षणिक आयुष्यात काही घडामोडी झाल्यानेच आपण लिहिते झालो. पत्रकारितेच्या क्षेत्रात आल्यानंतर एका नाटकावर समिक्षण लिहिल्याने आलेल्या अनुभवाच्या आधारे अतिशय दर्जेदार नाट्य तसेच लेखांची निर्मिती झाली असल्याचे त्यांनी सांगितले. नाटकांचे विषय आपल्यात असतात ते शोधण्याची गरज नाही, यासाठी जरा डोळे उघडे ठेवून बघा, मेंदू खुला ठेवा असे आवाहन त्यांनी उपस्थित तरुणाईला केले. दिलीप साळुंके यांनी दत्ता पाटील यांच्या नाट्य, साहित्य, पत्रकारिता आदींचा जीवनपट अतिशय खुमदार शैलीने मुलाखातीद्वारे समोर आणला.

या कार्यक्रमादरम्यान संगीतसुर्य केशवराव भोसले यांच्या दुर्मिळ फोटोचे तसेच त्यांच्यावरील एका माहिती पुस्तिकेचेही प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर पंडित भोजराज चौधरी, डॉ. संजय पाटील, उद्योजक साहेबराव साळुंके, न्यायमुर्ती वसंतराव पाटील, अशोकराव पाटील, महेंद्र बछाव, दिपक भदाणे, किशोर लोंढे, विशाल देसले, माधुरीताई भदाणे, मंगेश शिंदे, किशोर लोंढे, शिवाजीराव लोंढे, डॉ. राजाभाऊ लोंढे, राजेंद्र निंबाळते आदी उपस्थित होते. प्रारंभी कबीर आणि कियारा देसले या बालकांनी संस्कृत भाषेत सुभाषिताद्वारे उपस्थितांचे स्वागत केले. सांस्कृतिक कार्यक्रमात मंजू ठाकरे यांनी लावणी सादर केली तर पंडित भोजराज चौधरी, राहुल वडूरकर, गोरक्षनाथ पवल यांनी शास्त्रीय गायन नाट्य गीतांची पद गावून रसिकांना संगीतसुर्य केशवराव भोंसले यांच्या रंगभूमीवरील त्या काळातील सादरीकरणाची आठवणकरूनदिली.

राष्ट्रीय सांस्कृतिक परिषदचे प्रास्ताविक दिलीप साळुंके, सुत्रसंचलन पल्लवी यादगिरे-वैद्य यांनी तर आभार मनोज आमले, आणि मंगेश टर्ले यांनी मानले. यशस्वीतेसाठी ड. माधव मुधाळे, उल्हास बोरसे, सागर पाटील, महेंद्र बच्छाव, सतेज पाटील, संदीप सोमवंशी, सुनील घुले, उमेश शिंदे, बाळासाहेब आमरे, अरविंद देशमुख, डॉ. संदीप बोरसे, जयंत पवार, सचिन भामरे, विकी वाघ, एस. पी. पाटील, राजेंद्र मोरे, लक्ष्मी गर्दे, सरोज साळुंके, नंदकुमार वानखेडे, प्रकाश लेनेकर, विशाल इंगोले, सुनीता घुले, निर्मला साळुंके, राजेंद्र कोकाटे, संजय पाटील, निरजा भोसले, ओवी साळुंके, आदिंनी परिश्रम घेतले.

# क्षत्रिय समाज फाउंडेशन नाशकात उभारणार राजस्थान राजपूत भवन

### क्षत्रिय समाज सल्लागार समितीची स्थापना

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक हे धार्मिक पर्यटन स्थळ असून याठिकाणी दर बारा वर्षांनी कुंभमेळा भरत असतो. या धार्मिक क्षेत्रात विविध समाजांचे सेवा भवन आहे. मात्र अद्याप राजस्थान राजपूत समाज बांधवांना सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी व राज्याबाहेरून नाशिकमध्ये येणाऱ्या भाविकांच्या निवासाची व्यवस्था होण्यासाठी नाशकात राजस्थान राजपूत भवन नाही. या पार्श्वभूमीवर राजस्थान राजपूत भवन उभारण्याचा निर्णय क्षत्रिय समाज फाउंडेशनच्या वतीने घेण्यात आला आहे.

नाशिकच्या बालाजी हॉटेलमध्ये नुकतीच क्षत्रिय समाज फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीस राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली.



या सल्लागार समितीत वरिष्ठ सल्लागारपदी रंजीत सिंह चुंडावत, तेजपाल सिंह शेखावत, लक्ष्मण सिंह चौहान, मोहन सिंह शेखावत, दयाल सिंह चौहान, नरेंद्र सिंह जोधा, प्रेम सिंह राठौड़, मदन सिंह शेखावत, सुबे सिंह राघव यांची सल्लागार समितीत निवड करण्यात आली.

या बैठकीत क्षत्रिय समाज फाउंडेशनचे अध्यक्ष भगतसिंह राठौड़, उपाध्यक्ष विनोद सिंह शेखावत, सचिव सरवन सिंह शेखावत, प्रभारी नारायण सिंह राठौड़, कोषाध्यक्ष गिरवर सिंह राठौड़, समिती सदस्य बलवीर सिंह शेखावत, गजेंद्र सिंह शेखावत, प्रदीप सिंह राठौड़, संजीत सिंह राठौड़, राम सिंह भाटी, नेपाल सिंह, प्रदीप सिंह, अरविंद सिंह शेखावत, जगदीश सिंह राठौड़, कालू सिंह राठौड़, दलपत सिंह राठौड़, भगवान सिंह राठौड़, चंदन सिंह, छतर सिंह चौहान, अभय सिंह चुंडावत, पुष्पाल सिंह चुंडावत, मदन सिंह, अरविंद सिंह चुंडावत, बजरंग सिंह शेखावत, सोहन सिंह, छैल सिंह, किशोर सिंह, नरेंद्र सिंह जोधा, राम सिंह नरूका, राजेंद्र सिंह नरूका, महिपाल शेखावत, चैन सिंह, अजय सिंह राठौड़, प्रभु सिंह शेखावत, अर्जुन सिंह चौहान, तेजपाल सिंह संजीत सिंह यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# बाजीराव फाउंडेशनतर्फे विनामूल्य दांडिया महोत्सव

नाशिक । प्रतिनिधी

भाजपा प्रणित बाजीराव फाउंडेशनच्या वतीने विनामूल्य दांडिया महोत्सव आव्हाड चौक, चेतनानगर येथे दि.१५ ते २४ पर्यंत दररोज सायंकाळी ७ ते १० रात्री वाजेपर्यंत ऑर्केस्ट्राच्या तालावर, विद्युत रोषणाईच्या प्रकाश झोतात आयोजित करण्यात आला आहे.



दरवर्षीप्रमाणे याहीवेळी उत्कृष्ठ वेषभूषा, गरबानृत्य रास खेळणाऱ्यांना आकर्षक बक्षिस देण्यात येणार आहे. सुरक्षेसाठी सीसीटीवी कॅमेरा बसविण्यात येणार आहे. तसेच देवीचा देखावा घटस्थापना करण्यात येणार आहे. उत्सव आयोजक मंडळाचे संस्थापक, अध्यक्ष साहेबराव आव्हाड, माजी नगरसेविका पुष्पा आव्हाड तसेच युवराज बायास यांनी उत्तेजनार्थ बक्षिस देणार असल्याचे जाहीर केलेआहे. उत्सव यशस्वितेसाठी जगदीश आहेर, दादाजी साळुंखे, ब्रह्मनाथ महाजन, सनी सोनवणे, राजेश डोंगरे, कैलास खाडे आदी विविध समितीचे नियोजन करत आहे. या उत्सवात उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, मौजे मोहाडी प्र.ल., ता. जि. धुळे येथील सिटी सर्व्हे नं. ९२७ चे एकुण क्षेत्र १५२.६० चौ. मी.. येणे प्रमाणे मिळकत श्री. प्रमोद देविदास शिंदे व सौ. हेमांगी प्रमोद शिंदे, रा. मोहाडी उपनगर, धुळे यांचे मालकीची आहे. सदरहु मिळकतीवर घर बांधकाम करणे हेतु एच.डी.एफ.सी. बँक लि, शाखा देवपुर, धुळे यांचेकडे गृह कर्ज मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचे मालमत्तेचे मालकी हस्तांतरणा बाबतचे १) मा. दुय्यम निबंधक साो. धुळे यांचे कार्यालयात दिनांक २३/०२/२०१६ रोजीचे दस्त कं. १०१४/२०१६ अन्वये नोंदणीकृत खरेदीखत व त्याची एस. आर. पावती. २) मा. दुय्यम निबंधक साो. धुळे यांचे कार्या लयात दिनांक १८/०३/२०२१ रोजीचे दस्त कं. ११५५/२०१६ अन्वये नोंदणीकृत खरेदीखत व त्याची एस.आर. पावती.

येणे प्रमाणे मुळ दस्त हे माझे पक्षकार घेत असलेल्या गृह कर्जा बाबत लिंक दस्ताऐवज असुन सदरचे दस्ताऐवज कोणासही मिळाले असल्यास त्याचा कोणीही गैरवापर करू नये तसेच सदरचे खरेदीखत किंवा त्याची मुळ एस. आर. पावती कोणत्याही संस्थेकडे, बॅन्केकडे किंवा इतर कोणाहीकडे तारण गहाण/नजर गहाण असल्यास किंवा त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा हितसंबंध असल्यास किंवा कोणालाही मिळून आल्यास किंवा कोणाचाही उजर आक्षेप असल्यास पुराव्याचे मुळ कागद पत्रांसह खालील पत्त्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्याचे तारखेपासुन ७ (सात) दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन भेट घ्यावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकत/नोटीस आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच मुदतीनंतर कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सही पक्षकार
**श्री. प्रमोद देविदास शिंदे**

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र, माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे :
दिनांक : ११/१०/२०२३

**ॲड. विजय म. मोरे**
ऑफिस - बी / १२,
भन्साली प्लॉझा, नगरपटटी, धुळे.

---

**प्रोसेस जमा** **ॲड.**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर साो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज क्र.३२१ / २०२३**

साहेबराव गोरख वाल्हे उ. व ४७ धंदा - मंजूरी
रा. शेवाळी (दा) ता.साक्री जि.धुळे **..अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कोणीही नाही.** **... जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेम्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दिनांक २७/०९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. लताबाई गोरख वाल्हे यांचे दिनांक ०९/०२/२०१९ रोजी निधन झाले आहे मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१) श्री साहेबराव गोरख वाल्हे - मुलगा
२ ) श्रीमती भारती रमेश नेरकर - मुलगी
३) श्री. पप्पु गोरख वाल्हे - मुलगा
४) श्रीमती सुरेखा शरद वाल्हे - सून
५) कु. निखिल शरद वाल्हे - नातू
६) कु. रोहित शरद वाल्हे - नातू

मयतास वरील प्रमाणे वारस असून, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसाव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात दिनांक ०७/११/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत करण्यात यईल.

सदर जाहिर नोटीस नोटीस मे न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिद्धी दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक : / /

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री** **दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री**

---

**प्रोसेस जमा** **ॲड.**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर साो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज क्र.३०३/२०२३**

कमलबाई उत्तम नांद्रे उ. व. ६२ धंदा घरकाम
रा. छडवेल प ता.साक्री जि.धुळे **..अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कोणीही नाही** **... जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेम्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दिनांक.१३/०९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै उत्तम वंजी नांद्रे यांचे दिनांक २९/११/२०१९ रोजी निधन झाले आहे मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१) श्रीमती कमलबाई उत्तम नांद्रे - पत्नी
२ ) श्री. विलास उत्तम नांद्रे - मुलगा
३) श्री. नरेंद्र उत्तम नांद्रे - मुलगा
४) श्रीमती ललिता चंद्रकांत नांद्रे- सून
५) कु. प्रेरणा चंद्रकांत नांद्रे - नात
६) कु. जया चंद्रकांत नांद्रे- नात
७) चि कल्पेश चंद्रकांत नांद्रे - नातू

मयतास वरील प्रमाणे वारस असून, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसाव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात दिनांक. २०/१०/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत करण्यात यईल.

सदर जाहिर नोटीस नोटीस मे न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिद्धी दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक : / /

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री** **दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री**

---

**प्रोसेस जमा** **ॲड. सुनिल जी. नांद्रे**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर साो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. ३०४ / २०२३**

ग.भा. जयश्री राघवेंद्र गर्गे वै. उ.व. ३३, धंदा-घरकाम
रा. दिघावे ता. साक्री जि. धुळे **..अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

जिजाबाई काशिनाथ बहिरम **... जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दिनांक १३/०९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. राघवेंद्र पांडुरंग गर्गे यांचे दिनांक २९/०५/२०२३ रोजी निधन झाले आहे मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१) ग.भा. जयश्री राघवेंद्र गर्गे
२) कु. रुद्र राघवेंद्र गर्गे ( अ.पा. क)
३) कु. काव्या राघवेंद्र गर्गे ( अ.पा. क)
रा. दिघावे, ता. साक्री जि. धुळे

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे. त्या अर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात दिनांक १/११/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात यईल.

सदर जाहिर नोटीस नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीत दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक :- / / २०२३

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री** **दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री**

---

**प्रोसेस जमा** **ॲड. वनिता खैरनार**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर साो. यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं.३०५/२०२३**

१) श्रीमती चारुशिला आनंद भामरे, वगैरे- **..अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कुणीही नाही** **... जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला ( हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. १३/०९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ यांचे पती तसेच अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल नामे कै. आनंद गुलाबराव भामरे यांचे दिनांक १८/०९/२०१६ रोजी मौजे मालपुर ता. साक्री जि. धुळे येथे विजेचा झटका लागुन निधन झाले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

| वारसांची नावे | नाते / संबध |
|---|---|
| १. श्रीमती चारुशिला आनंद भामरे- | पत्नी |
| २. चि. मानसी आनंद भामरे- | मुलगी |
| ३. चि. अनन्या आनंद भामरे- | मुलगी |

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खाते निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि. २३/१०/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय कोर्ट साक्री** **दिवाणी न्यायालय, साक्री**

---

**प्रोसेस जमा** **ॲड. वनिता ऐ. खैरनार**
**निशाणी नं.- ६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर साो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. ३०२/२०२३**

गं.भा. विजयाबाई अरविंद अहिरराव वै.
उ.व. ५७, धंदा - घरकाम
रा. आष्टाणे ता. साक्री जि. धुळे **..अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कोणीही नाही.** **... जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दिनांक १३/०९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. अरविंद कृष्णा अहिरराव यांचे दिनांक १८/०७/२०२३ रोजी निधन झाले आहे मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१) गं. भा. विजयाबाई अरविंद अहिरराव
२) उमेशा संदिप रवंदळे
३) भाग्यश्री दुर्गश पाटील
४) धनंजय अरविंद अहिरराव

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे. त्या अर्थी या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात दिनांक २३/१०/२०२३ रोजी स्वत: अगर वकीलामार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात यईल. सदर जाहिर नोटीस नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीत दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक :- / / २०२३

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री** **दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री**

## न्यूज कॉलम

### नवउद्योजकांनी स्टँड अप इंडिया योजनेसाठी अर्ज सादर करावे

धुळे । भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त केंद्रशासनाने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील उद्योजकांसाठी स्टँड अप इंडिया ही योजना सुरु केली असून त्यासाठी अर्ज सादर करावे. असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त योगेश पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. योजनेअंतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील १८ वर्षावरील नवउद्योजकांना मार्जिन मनी उपलब्ध करून देणे ही योजना चालू आर्थिक वर्षांसाठी राबविण्यात येत आहे.या योजनेत राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील पात्र १८ वर्षावरील नवउद्योजक यांना १० टक्के स्वत:चा हिस्सा भरणा केल्यानंतर व राष्ट्रीयकृत बँकेने अर्जदारास स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरित फ्रंट एंड सबसिडीच्या अनुषंगाने प्रकल्प मूल्याच्या १५ टक्के अनुदान राज्य शासनामार्फत देण्यात येईल.

### सार्वे शिवारातू दुचाकी लांबवली

धुळे । शिंदखेडा तालुक्यातील सार्वे शिवारात लावलेली एमएच १८ एके ६३८५ क्रमांकाची १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने लांबवली. ही घटना २ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी सुरेश उत्तम पाटील (वय ६५) यांनी सोमवारी दुपारी फिर्याद दाखल केल्याने नरडाणा पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# जिथं दशहत केली, तिथंच सराईत गुंडाची काढली पोलिसांनी धिंड

## मालेगाव पोलिसांनी दिला निर्भीडतेचा संदेश

नाशिक । प्रतिनिधी

मालेगाव शहर परिसरात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून अशातच खून (चींवशी), प्राणघातक हल्ले, मारहाण, घातक शस्त्रे बाळगणे आदी गंभीर गुन्ह्यातील सराईत गुंड रब्बानी कदिर शेख याची पोलिसांनी शहरातील पवारवाडी भागातून धिंड काढली. ज्या भागात त्याने दहशत निर्माण केली होती, तिथेच बेड्या घालून धिंड काढत त्यांच्या गुंडगिरीचे भूत उतरविले. ही गुन्हेगारी दहशत मोडीत काढत जनतेला निर्भीडतेचा संदेश देत गावगुंडांवर पोलिसांचा वचक निर्माण केला.

नाशिकसह जिल्ह्याभरात सराईत गुन्हेगारांसह अल्पवयीन मुलांकडून गुन्हेगारीच्या घटना सातत्याने घडत आहेत. त्यामुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. मात्र हळूहळू पोलिसांनी याबाबत कडक पाऊले उचलत थेट सराईत गुन्हेगारांना धडा शिकवण्याचे काम सुरु केले आहे. सशस्त्र दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीचे मनसुबे मालेगाव पोलिसांच्या सतर्कतेमुळे उधळले गेले. मालेगाव परिसरातील लब्बैक हॉटेल परिसरात लुटमारीच्या उद्देशाने आपल्या साथीदारांसह लब्बैक हॉटेल परिसरात आलेल्या रब्बानीला पवारवाडी पोलिसांनी अटक केली आहे. या टोळीतील तिघांच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले असून दोन जण फरार झाले. संशयितांकडून दोन गावठी बंदुका, सहा जिवंत काडतुसे, एक तलवार जप्त करण्यात आली आहे. रब्बानीवर पवारवाडी व शहर पोलिस ठाण्यांमध्ये पाच गंभीर गुन्हे दाखल आहेत.

दरम्यान मालेगाव शहरातील गुन्हेगारी मोडीत काढण्याचा इशारा अपर पोलिस अधीक्षक अनिकेत भारती यांनी दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर शहरात सातत्याने पेट्रोलिंग सुरु आहे. तसेच रात्रीच्या सुमारास काही जण रस्त्याने जाणाऱ्या लोकांना शस्त्राचा धाक दाखवून भ्रमणध्वनी आणि पैसे लुटत असून ते राष्ट्रीय महामार्गावरील एका हॉटेलकडे निघाले असल्याची माहिती पवारवाडी पोलिसांना मिळाल्यानंतर पथकाने संबंधित ठिकाणी धाव घेतली. पोलिसांची चाहूल लागताच संशयितांनी पळ काढला. पाठलाग करत तिघांना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. पकड्ण्यात आलेल्यांमध्ये शेख रब्बानी शेख जहीर, जलाल मोहम्मद हनीफ या तिघांचा समावेश आहे. रब्बानी हा सराईत गुन्हेगार असून सर्व संशयितांविरुद्ध पवारवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### गुन्हेगारीच्या घटनांचे सत्र सुरूच

दरम्यान रब्बानीसोबत पकडलेल्या दोघांची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासली जात आहे. इतर गुन्ह्यांच्या तपासात रब्बानीला संबंधित पोलिस ठाण्याकडून ताब्यात घेण्याची कार्यवाही केली जाणार असल्याचेही पोलिसांनी सांगितले. फरार संशयितांमध्ये शाहिद शकील अहमद उर्फ अख्तर काल्या, मोहम्मद रजा याचा समावेश असून संशयितांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. शहरात सातत्याने मारहाणीच्या, जाळपोळीच्या घटना घडत आहेत. गुन्हेगारीच्या घटनांचे सत्र बघून पोलिसांनी यावर धडक मोहीम राबविण्यास सुरवात केली आहे. तात्पुरती कारवाईने संशयित धजावत नसल्याचे या घटनांवरून दिसून येते. मागील एक महिन्याच्या घटनाक्रम जरी लक्ष घातले तरीही शहरातील गुन्हेगारी किती मोठ्या प्रमाणात वाढली आहे याचा अंदाज येत आहे.

### दरोडा टाकण्याच्या तयारीत असतानाच धाड

शेख रब्बानी उर्फ रब्बानी दादा हा एक कुख्यात गुन्हेगार असून गेल्या अनेक महिन्यांपासून पोलिस त्याच्या मागावर होते. शहर व परिसरात बऱ्याच काळापासून त्याचा उपद्रव वाढल्याने नागरिकांमध्ये दहशतीचं वातावरण होतं. शेख रब्बानी आणि त्याचे साथीदार हे विविध ठिकाणी दरोडा टाकून, लुटालूट करून फरार व्हायचे. त्यामुळे नागरीक अतिशय त्रासले होते. पोलीसही बऱ्याच महिन्यांपासून त्याचा शोध घेत होते. शेख रब्बानी आणि त्याचे इतर साथीदार हे दरोडा टाकण्याच्या तयारीत असतानाचा पोलिसांनी कारवाई करत त्यांना अटक करत त्यांचा प्लान उधळून लावला. मालेगाव पवारवाडी पोलिसांनी त्यांच्याकडून दोन देसी पिस्तुल, सहा जिवंत काडतूस आणि एक तलवार असा मुद्देमालही जप्त केला. मालेगाव येथील अप्पर सत्र न्यायालय यांनी १३ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी ठोठावली आहे.

### दहशत कमी व्हावी म्हणून काढली धिंड

या गुंडाची शहरात खूपच दहशत होती, लोकं त्यांना खूपच घाबरायचे. हेच लक्षात घेऊन आणि लोकांच्या मनातील त्यांची दहशत कायमची नष्ट व्हावी यासाठी पोलिसांनी या सर्व आरोपींची त्या परिसरात धिंड काढली. त्यांच्या या कृतीची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे.

# मुरघासा बनवण्यासाठी हिरव्या मकाला वाढती मागणी



### पशुपालकांची लगबग

वरुळ । प्रतिनिधी

शिरपूर तालुक्यातील शेतकरी शेतीला पर्यायी जोडधंदा म्हणून दूध उत्पादनाकडे वळले आहेत, आणि विक्रमी दूध

संकलन करीत आहे.त्यामुळे वर्षभरासाठी जनावरांना चाऱ्याची कमतरता भासू नये म्हणून ,ऐन उन्हाळ्या ,पाठोपाठ आता पावसाळ्यात सुध्दा जनावरांचा चारा साठवण्यासाठी पशुपालक शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे. त्यामुळे मिळेल तेथून हिरवा मक्क्याचा चारा खरेदी करून त्यांचे रूपांतर मुरघासात करून ठेवण्यासाठी लगबग सुरू झाली आहे.

शिरपुर तालुक्यामध्ये मुरघासासाठी लागणाऱ्या हिरव्या मक्याच्या पिकाला प्रचंड मागणी वाढली आहे. त्यामुळे मका उत्पादक शेतकऱ्यांना ही अगदी तीन ते चार महिन्यांत हिरव्या मक्याच्या चाऱ्यातून चांगले उत्पन्न मिळत आहे. कंपनीच्या मुरघास हा सहा ते सात हजार रुपये प्रति टन मिळतो तर शेतकऱ्यांकडील हिरवी मका दोन हजार रुपये प्रति टन घेऊन कुट्टी करुन ,पन्नी,व पॅंकिंग साठी लागणारी बॅंगचा खर्च सहासे रुपये, मकाचा चारा कुट्टी मशीनव्दारे करुन भरुन देण्याचा खर्च नउशे रुपये एक टन मकाची कुट्टी भरल्या जाते, ते पशुपालकांना तिन हजार पाचशे रुपये टनासाठी खर्च येतो, सध्या अनेक शेतकरी हे मक्याचे पीक जनावरांच्या चाऱ्यासाठी घेऊ लागले असून, वर्षातून तीनवेळा या पिकाचे उत्पन्न निघत असून, दर तीन महिन्याला एकरात २५ ते ३० टनांहून अधिक उत्पादन हिरव्या मक्याच्या चाऱ्याचे मिळत आहे.कमी खर्चात एका वर्षात एका लाखाच्या आसपास आर्थिक उत्पन्न मका उत्पादक शेतकऱ्यांना मिळत आहे.

मुरघासचे फायदे

जनावराची भूक वाढते.व ते मुरघास जास्त खातात. वाया घालवीत नाहीत. कारण तो रुचकर, स्वादिष्ट व सोम्य रेचक असतो. वाळलेल्या चाऱ्याच्या तुलनेत मुरघासाची पौष्टिकता उत्तम असते. मुरघासाकरिता चारा पिकाची कापणी फुलोरा अवस्थेत केली जात असल्यामुळे जास्तीत जास्त अन्नदव्ये चाऱ्यामध्ये येतात. मुरघास मुळे जनावरांच्या पचनक्रियेत वाढ होऊन दूध उत्पादनात वाढ होते.

# देवळाली येथे दोन दिवसीय सत्संग आणि नामदान (अनुग्रह) कार्यक्रम

धुळे । प्रतिनिधी

सावन कृपाल रुहानी मिशनचे अध्यक्ष, संत राजिंदर सिंह जी महाराज यांच्या कृपेने देवळाली, जिल्हा नाशिक येथे दिनांक १२ ऑक्टोबर व १३ ऑक्टोबर २०२३ रोजी दोन दिवसीय सत्संग आणि नामदान (अनुग्रह) कार्यक्रमासाठी आगमन होणार आहे.

यामध्ये गुरुवार, दिनांक १२-१०-२०२३ रात्रौ ८ वाजता-सत्संग ,शुक्रवार दिनांक १३-१०-२०२३ दोपारी ३ वाजता-दर्शन संध्याकाळी ६ वाजता -सत्संग रात्रौ ८ वाजता -नामदान (अनुग्रह) तर कॅन्टोन्मेंट ग्राउंड, आनंद रोड, देवळाली कॅम्प, जिल्हा नाशिक येथे होणार आहे.



संत राजिंदर सिंह जी महाराज यांना ध्यान-अभ्यासाच्या माध्यमातून संपूर्ण विश्वभरात आंतरिक व बाह्य शांतिचा प्रसार करण्याकरीता आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त झालेली आहे. पूर्ण विश्वभरात ध्यान-अभ्यासाचे गुरु आणि विश्वप्रसिद्ध लेखक संत राजिंदर सिंह जी महाराज मागील ३० वर्षापासून शांति, प्रेम व मानव एकतेच्या संदेशाचा प्रसार विश्व भरात करण्यासाठी प्रसिद्ध आहेत. संत राजिंदर सिंह जी महाराज यांचे जीवन, त्यांचे कार्य मानव जीवन आणि त्याचा मुख्य उद्देश यांच्या प्राप्ती करिता प्रेम आणि निरंतर निस्वार्थ सेवेचे व्रत आहे. त्यांनी विश्वभरात सर्व क्षेत्रातील लाखो लोकांना ध्यानाभ्यासाची विधी शिकवून आपल्या वास्तविक आत्मिक रुपाशी जोडण्याचे महान कार्य केले आहे. त्यांचा संदेश आशा, प्रेम, मानव एकता आणि निस्वार्थ सेवेचा आहे. संत राजिंदर सिंह जी महाराज यांची ध्यानाभ्यास या विषयावरील पुस्तके सर्वोच्च विक्रीचा उचांक नोंदविणारे विश्व प्रसिद्ध लेखक आहेत. त्यांची पुस्तकं ५५ पेक्षा अधिक भाषांमध्ये उपलब्ध आहेत. त्यांच्या प्रमुख पुस्तकांमध्ये 'ध्यानाभ्यासाद्वारे आंतरिक आणि बाह्य शांति' या पुस्तकाचा समावेश आहे. जो बार्न्स आणि नोबलच्या ध्यान-अभ्यास विषयावरील सर्वात जास्त विक्री झालेले पुस्तक आहे. संत राजिंदर सिंह जी महाराजांना विभिन्न देशांद्वारे अनेक शांति पुरस्कार व सन्मानपत्रे तसेच पाच डॉक्टरेटच्या पदव्यांनी सन्मानित करण्यात आलेले आहे.

सावन कृपाल रुहानी मिशन एक आध्यात्मिक ना नफा ना तोट्यावर चालणारी संस्था आहे. यांचे विश्वभरात ३,३०० हून अधिक केंद्र आहेत आणि यांचे साहित्य जगातील ५५ हून अधिक भाषांमध्ये उपलब्ध आहे. यांचे मुख्यालय- विजयनगर, दिल्ली येथे असून आंतरराष्ट्रीय मुख्यालय नेपरविले, अमेरिका येथे स्थित आहे. आम्ही आपणास अनुरोध करतो की, संत राजिंदर सिंह जी महाराज यांच्या दोन दिवसीय सत्संग व नामदानाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# गोदावरीकाठी लवकरच संत गोरोबा कुंभार मंदिर उभारणार : आ. फरांदे

### एक कोटी रुपयांचा निधी मंजूर

सातपूर । प्रतिनिधी

पितृपक्ष संपल्यानंतर पुढील महिन्यात नाशिकमध्ये गोदावरी काठावर आमदार निधीतून संत शिरोमणी गोरोबा कुंभार मंदिर कामाचा शुभारंभ करण्याचे आश्वासन आ. देवयानी फरांदे यांनी शिष्टमंडळाला दिले.

नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समितीच्यावतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात आ. देवयानी फरांदे यांनी नाशिकमध्ये लवकरच संत गोरोबा कुंभार यांच्या मंदिरासाठी सरकारकडून एक कोटी रुपयांचा आमदार निधी मंजूर केल्याची घोषणा केली होती. त्याअनुषंगाने नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष रमाकांत क्षिरसागर, जिल्हाध्यक्ष सोमनाथ सोनवणे, शहराध्यक्ष गणेश आहेर तसेच के.के. चव्हाण, रमेश गायकवाड, वसंत गाडेकर, जगदीश मोरे आदिंसह पदाधिकाऱ्यांनी आ. फरांदे यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. कुंभार समाजाच्या मागणीची दखल घेऊन समाज मंदिरासाठी आमदार निधी मंजूर करुन आणल्याबद्दल ऋण व्यक्त केले. लवकर या कामाचा शुभारंभ करावा अशी मागणी केली. तर गोदावरी काठावरील विटभट्टीच्या जागेत संत गोरोबा काकांच्या समाज मंदिराचा आराखडा सरकारकडून मंजूर करुन घेतला आहे. त्यासाठी एक कोटी रुपयांच्या आमदार निधीला देखील मंजुरी मिळाली आहे. पुढील महिन्यात या कामाचा शुभारंभ करण्याचा प्रयत्न आहे असे आश्वासन आ. फरांदे यांनी शिष्टमंडळाला दिले आहे. नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समितीच्यावतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात आ. देवयानी फरांदे यांनी नाशिकमध्ये लवकरच संत गोरोबा कुंभार यांच्या मंदिरासाठी सरकारकडून एक कोटी रुपयांचा आमदार निधी मंजूर केल्याची घोषणा केली होती.

# हिंदू धर्माच्या प्रसार आणि प्रचारात स्वामी विवेकानंदांचे योगदान मोठे

### ज्येष्ठ पत्रकार पद्मश्री रमेश पतंगे यांचे प्रतिपादन

नाशिक । प्रतिनिधी




हिंदू धर्माच्या प्रसार आणि प्रचारात स्वामी विवेकानंदांचे योगदान मोठे आहे. त्यानंतर त्यांच्या विचारधारेवर उभा राहिलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे यात मोठे योगदान आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्वयंसेवकांमार्फत देशभर जाळे निर्माण करून हिंदू शब्दाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे काम करू लागला. या सगळ्यात जवळपास ५० वर्षांचा कालखंड गेला. दरम्यान, 'कॉल मी डोंकी बट डोंट कॉल मी हिंदूची विचारधारा हळूहळू क्षीण होत गेली. त्यानंतर राम जन्मभूमी मुक्ती आंदोलनाने जेव्हा जोर पकडला, तेव्हा मग घोषणा आली 'गर्व से कहो हम हिंदू हैं'. म्हणजे 'डोंकी' पासून 'गर्व' पर्यंत इतका मोठं परिवर्तन हिंदू धर्माविषयी झाले.

आजच्या घडीला हिंदू धर्माविषयी कोणतीही घोषणा अथवा ओळख द्यायची गरज भासत नाही. संपूर्ण जगाला हिंदूचे महत्त्व ज्ञात आहे. त्यामुळे आताचा कालखंड हा खऱ्या अर्थाने हिंदू म्हणून जगण्याचा कालखंड आहे, असे प्रतिपादन सेन्सॉर बोर्डाचे सदस्य, विचारवंत, ज्येष्ठ पत्रकार व पद्मश्री रमेश पतंगे यांनी केले.

रामतीर्थ गोदावरी सेवा समितीच्यावतीने गोदावरी नदीबद्दल नागरिकांच्या मनात पूज्य श्रद्धाभाव प्रकट व्हावा, यासाठी आरती व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यात जवळपास १५० कार्यकर्त्यांनी समाजामध्ये जाऊन नागरिक व विद्यार्थ्यांना गोदावरीची महती विशद केली. या सगळ्यांचे कौतुक करावे व नाशिककर नागरिकांना रामतीर्थ गोदावरी सेवा समितीच्या उपक्रमाची माहिती व्हावी, या उद्देशाने रविवारी शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी न्यास सभागृहात गोदाप्रेमींचे स्नेह मिलन व सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.

रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक तथा प्रदेश भाजपचे माजी संघटन मंत्री प्रा. रवी भुसारी हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. यावेळी रा. स्व. संघाचे नाशिक विभाग संघचालक कैलास साळुंके, आ. सीमा हिरे, आ.ॲड. राहुल ढिकले, रामतीर्थ गोदावरी सेवा समितीचे अध्यक्ष जयंत गायधनी, इस्कॉन नाशिकचे अध्यक्ष कृष्णधन प्रभू, आर्ट ऑफ लिव्हिंगचे चिराग पाटील आणि गोदाप्रेमी, शिक्षक व गोदा सेवक उपस्थित होते.

# पिंपळनेर सखी मंच संस्कृती संवर्धन व प्रबोधनात्मक कार्यक्रमाला महिलांचा उदंड प्रतिसाद

पिंपळनेर । प्रतिनिधी

येथील सखींमंच तर्फे संस्कृती संवर्धन व प्रबोधन पर कार्यक्रम प्रा.प्रतिभा जाधव यांचा मी अरुण बोलतेयहा एकपात्री प्रयोग व श्रीमती प्रतिभा गोवर्धन यांचे आरोग्यावर बोलू काही हे व्याख्यान महिलांच्या प्रचंड प्रतिसादात संपन्न झाले.मी अरुण बोलतेय हे एकपात्री नाट्य सादर होत असताना अनेक महिलांच्या भावना अनावर झाल्या होत्या.

या कार्यक्रमाला पिंपळनेर मधील सर्व जाती धर्मातील महिलांनी प्रतिसाद देत कार्यक्रमाला जवळपास दोन हजार महिला भगिनी उपस्थित होत्या.या कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी इंदुमती राजाराम पवार होत्या.आपल्या आयुष्यात ४२ वर्ष संघर्ष करणाऱ्या अरुणा शानबाग यांच्यावर आधारित एकपात्री प्रयोग व प्रतिभा गोवर्धन यांचे आरोग्यावर बोलू काही यात आई व लेक यावर महिलांशी संवाद साधला. या दोन्हीही




कार्यक्रमांना महिला व मुलींनी भरभरून प्रतिसाद दिला. कार्यक्रमचे सूत्रसंचालन डॉ प्रतिभा देशमुख चौरे यांनी केले तर परिचय दीपाली दळवेलकर, प्रा सविता पगारे, ज्योति अहिरे यांनी करून दिला. तर सखींमंच संकल्पना उद्दिष्ट्ये डॉ शुभांगी कोतकर यांनी यांनी केले.राजश्री विसपुते यांनी नवदुर्गा व स्त्री गौरव गीत गायले.चेतना पाटील गांगुर्डे यांच्या मार्गदर्शना कर्म आ मा पाटील व इंदिरा कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी नवदुर्गा आदिशक्ती नृत्य खूपच सुंदर सादर केले. महिषासूर हुंडाबळी, स्त्रीभ्रूणहत्या बलात्कार, अत्याचार अन्यायाचे प्रतिक म्हणून दाखवले. कै.हरिभाऊ आश्रम शाळेच्या विद्यार्थिनींनी इशस्तवन व स्वागतगीत सादर केले. तर कार्यक्रमात सहभागी मुलींची तयारी आर पी एस मेकअप स्टुडिओ रंजना बागुल व स्मिता चौधरी यांनी केले.अध्यक्षीय भाषणात इंदुमती पवार यांनी संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेतला.व एक सुंदर स्वलिखित गीत गायले.तर आभार प्रदर्शन साने गुरुजी शाळेच्या आदर्श शिक्षिका मनीषा भदाणे यांनी केले.या कार्यक्रमास पिंपळनेर येथील महिलांनी सढळ हाताने आर्थिक मदत देत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. सदर कार्यक्रमास पिंपळनेर येथील साई कृष्णा लान्स चे मालक मा जि प सदस्य यांनी विनामूल्य हॉल उपलब्ध करून दिला.या कार्यक्रमास अनिस पिंपळनेरच्या अमिता बच्छाव, छाया वाडेकर, मंडळ अधिकारी मनीषा अहिरे, सुरेखा अहिरे, मनीषा पगार, रेखा पाटील,अनिता सोनवणे,यांनी सहकार्य केले.

# मानव अधिकार संघटन धुळे जिल्हाध्यक्षपदी जयंत साळुखे

धुळे । प्रतिनिधी

राष्ट्रीय मानवाधिकार संघटन धुळे जिल्हाध्यक्षपदी मेकॅनिकल असोसिएशन उत्तर महाराष्ट्राचे विभागीय अध्यक्ष तथा शिवम ऑटो गॅरेजचे मालक जयंत (अजय) साळुंखे यांची निवड झाली. संघटनचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संगेश कुमार भाटी (संगाराम) यांनी निवड झाल्याचे जाहीर केले.



संघटनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मुस्ताकभाई जहांगीर शेख, प्रदेश अध्यक्ष भटूआप्पा चौधरी यांनी त्याबाबत शिफारस केली. श्री. साळुंखे यांच्या निवडीबद्दल मैकेनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष मुकुंद कुलकर्णी, उपाध्यक्ष मुक्तार शेख, सोनल अग्रवाल, पवन शर्मा, हेमंत पाटील आदींनी समाधान व्यक्त करीत शुभेच्छा दिल्या.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





## महाविद्यालयामार्फत होणार आता महसुल विभागाच्या योजनांची प्रसिद्धी

### उपविभागीय अधिकारी यांच्यासोबत झाला ३ वर्षांसाठी करार















धुळे | महसुल विभागाच्या योजनांची माहिती शहरी व ग्रामीण भागात तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी आता शहरातील ७ महाविद्यालयांशी धुळे उपविभागीय अधिकारी कार्यालयांने आज करार केला आहे. उपविभागीय कार्यालय, धुळे येथे झालेल्या या कराराप्रसंगी उपविभागीय अधिकारी राहुल जाधव, शहर तहसिलदार विनोद पाटील, ग्रामीण तहसिलदार अरुण शेवाळे,नायब तहसीलदार संजय शिंदे, जयहिंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एच. पवार, एसएसव्हीपीएस महाविद्यालय, डॉ. एम. व्ही पाटील, उपप्राचार्य श्री. के. एस. बोरसे, विद्यावर्धिनी महाविद्यालय, डॉ. मधुकर वानखेडे, पालेशा महाविद्यालय, डॉ. प्रभाकर महाले, गंगामाई महाविद्यालय, डॉ. एस. आर. पाटील, अभय महिला महाविद्यालय, डॉ. एस. जी. बाविस्कर, एसएनडीटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डॉ.डी. झेड चौधरी आदी उपस्थित होते. यावेळी उपविभागीय अधिकारी श्री. जाधव म्हणाले की, महसुल विभागाच्या लोक कल्याणकारी योजनांचा प्रचार, प्रसार, प्रबोधन व अंमलबजावणी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमार्फत प्रभावीपणे राबविण्यासाठी धुळे शहरातील महाविद्यालये आणि उपविभागीय अधिकारी, धुळे यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. शासनाशी करार झालेले धुळे शहरातील महाराष्ट्रातील एक नामांकित व शैक्षणिक नेतृत्व करणारे ही महाविद्यालय आहे.`.यावेळी एस एस व्ही पी एस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, हा उपक्रम धुळे जिल्ह्यातील पहिलाच उपक्रम असून अशाप्रकारे महसूल प्रशासनातील राबवल्या जाणाऱ्या योजनांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागी होता येणार असून उपविभागीय कार्यालय राबवित असलेल्या या उपक्रमातून सरकारी कामकाजाचा अनुभव व ओळख विद्यार्थ्यांना होईल. तसेच याचा लाभ ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होणार असून प्रशासन व नागरिक जवळ येण्यास मदत होणार असल्याचे डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

गुरुवार, दि. १२ ऑक्टोबर २०२३





# शिरपुरात एक दिवसीय योग कार्यशाळा संपन्न

## आधुनिक काळात योगचिकित्सेचे महत्त्व या विषयांवर मार्गदर्शन

























होळनांथे।
काही मानवी जीवनात उत्तम आरोग्यासाठी योग साधनेचे अनन्य साधारण महत्व असून, त्याउद्देशानेच योगशास्त्राचा प्रचार व प्रसारासाठी शिरपुरात एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. योगशिक्षक व योगसाधकांसाठी योग विद्याधाम शिरपूरतर्फे आयोजित सदर कार्यशाळेत धुळे येथील योग विद्या धामचे सचिव प्रा. डा. जितेंद्र भामरे यांनी आम्ही बी -घडलो, तुम्ही  बी - घडाना तर शिरपूर योग विद्या धामचे कार्याध्यक्ष डा. श्रीकांत वाडीले यांनी योगाभ्यासातील अडथळे व उपाय या विषयावर मार्गदर्शन केले तसेच उद्योजक सुधाकर दानू यांनी मला जिंकायचंय धुळे येथील विद्यावर्धिनी महाविद्यालयाचे  प्रा. विलास चव्हाण यांनी व्यक्तिमत्व व योग तर डा. दिलीप पाटील यांनी आधुनिक काळात योगचिकित्सेचे महत्त्व या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेच्या सुरुवातीला सकाळी ०६:३० ते ०८ वाजे दरम्यान योगानुभुती वर्ग घेण्यात आला यावेळी योगसाधकांमार्फत विविध योगासने करण्यात आलीत. तदनंतर डॉ. दिलीप पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सदर कार्यक्रमात  विविध मान्यवरांचे मनोगत, मौनसाधना, योगनिद्रा, भोजन, योग साधकांचे मनोगत आदी विविध कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेत. कार्यक्रमास विद्यालयाच्या प्राचार्या सौ. डॉ. वर्षा वाडीले यांच्यासह योगशिक्षक व योगसाधकांचे सहकार्य लाभले.

संकलन : योगेश पाटील, होळनांथे